CMYK

बीड । गुरूवार

०८.०५.२०२५

वर्षे : ५ अंक : ३७

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■





dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955



# Operation Sindoor २.० : पाकिस्तानातील केवळ दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करून भारत थांबणार नाही

**नवी दिल्ली**

भारताने दहशतवादाविरुद्ध पाकिस्तानला दिलेला संदेश ही केवळ एक सुरुवात आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पीओकेमधील नऊ दहशतवादी छावण्यांना लक्ष्य करून एअरस्ट्राईकची अचूकता दाखवून दिली. यामध्ये सुमारे १०० दहशतवादी मारले गेले. या हल्ल्याने पाकिस्तान चांगलाच हादरला. तरीही भारतीय लष्कराने म्हटले आहे की मिशन ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे. यावरून हे स्पष्ट होते की




पाकिस्तानवरील धोका अद्याप टळलेला नाही. कारण ऑपरेशन सिंदूर २.० मध्ये काहीही घडू शकते. भारत सध्या शांत आणि संयमी मनःस्थितीत आहे. भारताने राजकीयदृष्ट्या पाकिस्तानला एकटे पाडण्याचा योग्य तो प्लॅन केला आहे आणि अंमलबजावणीही सुरू आहे. त्यातच बलुच लोक पाकिस्तान सरकारवर अजिबात खूश नाहीत. एवढेच नाही तर तेथील स्थानिक पोलिसही सरकार आणि लष्कराच्या कृतींवर नाराज आहेत. अशा परिस्थितीत, पाकिस्तानमध्ये अंतर्गत कलह तीव्र होऊन पाकिस्तानची आणखी दोन भागांत फाळणी करण्याची भारताकडे सुवर्णसंधी आहे. यामुळे जगाला एक मजबूत संदेश जाईल की जर कोणत्याही देशाने भारताशी पंगा घेतला, तर भारतीय सैन्यातील प्रत्येक सैनिक शत्रूसाठी काळ बनून अंगावर चाल करेल.

### • ऑपरेशन सिंदूर २.० मध्ये काय होईल?

बलुचिस्तान हा पाकिस्तानसाठी 'दुखरी नस' आहे. पाकिस्तान सरकार याबाबत शक्य तितके मौन बाळगतो. असे मानले जाते की ऑपरेशन सिंदूर २.० मध्ये भारत पाकिस्तानला बलूचिस्तान वेगळे करण्यास भाग पाडायाला लावून त्रास देऊ शकतो. ऑपरेशन सिंदूर २.० मध्ये भारत १९७१ च्या युद्धाप्रमाणे बलुचिस्तानला वेगळे करण्याची योजना आखू शकतो. यामुळे संपूर्ण जगाला भारताची शक्ती कळेल. असे घडल्यास केवळ पाकिस्तानच नव्हे तर त्यांना पाठिंबा देणारे चीन आणि तुर्कस्थानलाही संदेश जाईल.

### • १ एअरस्ट्राईक नंतर पाकिस्तानची पळापळ


ऑपरेशन सिंदूर हा केवळ एक ट्रेलर असल्याचे मानले जात आहे. त्याचवेळी, भारताने हे स्पष्ट केले आहे की दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्यांसाठी कोणतीही हयगय बाळगली जाणार नाही. या हल्ल्यानंतर पाकिस्तानमध्येही भीतीचे वातावरण आहे. पंजाब प्रांतात आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी आजच्या एअरस्ट्राईकला 'युद्धासाठीची चिथावणी' म्हटले आहे आणि प्रत्युत्तर देण्याबद्दल दर्पोक्तीही केली आहे. पण लष्करप्रमुख मुनीर अजूनही गप्प आहेत. त्यामुळे भारताच्या या कृतीतून पाकिस्तानच्या राजकीय आणि लष्करी नेतृत्वावरचा दबाव स्पष्टपणे दिसून येतो.

## जैश-ए-मोहम्मदचं मुख्यालय उद्ध्वस्त

### निष्पापांचा बळी घेणाऱ्या मसूद अझहरवर हिशोब देण्याची वेळ

**नवी दिल्ली**

भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताचा गुन्हेगार दहशतवादी मसूद अझहरचंही कंबरडं मोडलं. मसूद अझहरच्या कुटुंबातील १० जणांचा खात्मा केला. निष्पापांचा बळी घेणाऱ्या मसूदच्या कुटुंबावरच हिशेब देण्याची वेळ आल्यानं अझहर हादरून गेला. पाकिस्तानातल्या बहवालपूर मधील जैश-ए-मोहम्मदचं मुख्यालय . दहशतवाद्यांचा अड्डा, ट्रेनिंग कॅम्प आणि मदरसा असलेल्या




या मुख्यालयाची आता अशी अवस्था झाली आहे. भारताच्या एअर स्ट्राईकमध्ये मरकज सुबहान अल्ला नावानं ओळखलं जाणारं जैशचं हे मुख्यालय उद्ध्वस्त झालं. भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी मसूर अझरचा हा गड होता. पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतानं त्याचीच निवड का केली, याचं उत्तर सैन्यानं दिलं.

मसूद अझहरचे मुख्यालय उद्ध्वस्त- मरकज सुबहान अल्लावर हल्ला करून दहशतवादी मसूर अझरचं कंबरडंच भारतीय सैन्यानं मोडलं आहे. या हल्ल्यात मसूद अझहर बचावला. पण त्याच्या कुटुंबातल्या १० जणांचा आणि ४ जवळच्या सहकाऱ्यांचा खात्मा झाला. हल्ल्यात मसूद अझहरचा भाऊ रौफ असगर गंभीर जखमी झाला. तर रौफचा मुलगा हुजैफा आणि रौफची सून आणि मसूदच्या बहिणीचा मृत्यू झाला. रौफ असगर हा भारतातील मोस्ट मोस्ट वॉन्टेड दहशतवादी आहे.

हल्ल्यात संपूर्ण कुटुंबच उद्ध्वस्त झाल्यानं शेकडो जणांचा बळी घेणारा मसूद अझहर हादरून गेला. 'भारताच्या हल्ल्यात मीही मेलो असतो तर बरं झालं असतं, भारत ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाकला धडा शिकवण्यासाठी राफेल विमान का निवडले गेले? नेमकं खासं काय?

**नवी दिल्ली**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने चोख प्रत्युत्तर दिले आहे. भारतीय लष्कराने याला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव दिले आहे. पहलगाम हल्ल्याच्या १५ दिवसांत भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये एकूण नऊ ठिकाणी हल्ला केला. याच ठिकाणांहून दहशतवादी हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी केली जात होती. ही भारतीय लष्कर आणि हवाई दलाची संयुक्त कारवाई होती ज्यामध्ये अचूक हल्ला करणारी शस्त्रे वापरली गेली.

या ऑपरेशनमध्ये फ्रान्सकडून खरेदी केलेले राफेल विमान वापरले गेले. या विमानांमधून स्कॅल्प क्षेपणास्त्रे डागण्यात आली. राफेलने शत्रूच्या घरात घुसून कहर केला. स्टॉर्म शॅडो किंवा स्कॅल्प



हे एक शस्त्र आहे जे फक्त लढाऊ विमानातून डागले जाते. यासाठी राफेल विमान सर्वात योग्य आहे.

राफेल-स्कॅल्पची घातक जोडी- भारतीय हवाई दलाने फ्रान्सकडून खरेदी केलेल्या सर्व राफेल लढाऊ विमानांना स्कॅल्प क्षेपणास्त्रांनी सुसज्ज केले आहे. राफेलचा वेग ध्वनीच्या वेगापेक्षा जास्त असल्याने आणि स्कॅल्प क्षेपणास्त्राच्या प्रहार शक्तीमुळे, ही जोडी अत्यंत धोकादायक बनते. ऑपरेशन सिंदूर यशस्वी करण्यात या जोडीने महत्त्वाची भूमिका बजावली. १३०० किलो वजनाच्या ▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहराच्या संदर्भात आ.क्षीरसगरांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक

### पावसाळ्यापूर्वी स्वच्छता कामे, टॅक्स रिव्हीजनसह, नगर रोडवरील रस्ता क्रॉसिंग या महत्वाच्या मुद्यांवर झाली सविस्तर चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पूर्वी शहरातील नालेसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन करणे तसेच बीड नगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) करण्यासाठी सुव्यवस्थित करणे तसेच बीड शहरातील नगर रोडवर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना नगर नाका यांमध्ये रस्ता क्रॉसिंग अशा विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.७) रोजी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत




बैठक घेतली.

बीड शहरात पावसाळ्याच्या अगोदर नालेसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी कामे होणे गरजेचे आहे. जेणेकरून नागरिकांचे आरोग्य आणि शहरातील स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होणार नाही. यासोबतच बीड नगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत सुव्यवस्थित नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. यासोबतच नगर रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना नगर नाका यादरम्यान सर्व शासकीय कार्यालये आहेत. परंतु याठिकाणी एकही रस्ता क्रॉसिंग नाही त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. बीड शहाराच्या अनुषंगाने या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. दरम्यान पावासाळ्यापूर्वी स्वच्छतेची कामे करण्यासाठी योग्य नियोजन करण्याबाबत तसेच

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडच्या पाणी पुरवठ्या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट सीईओंना दिल्या फोन वरुन सूचना

**बीड । प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्यात बीडकरांना पंधरा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. मात्र बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काडीवडगाव येथील प्लॉटचे काम महिनाभरापासून नागरिकांना पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी आज मंगळवारी (दि.६) काडीवडगाव येथील प्लॉटची



पाहणी केली. यावेळी तिनही जिल्हाप्रमुखांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन करुन बीडच्या पाणीप्रश्नाचे गांभिर्य निदर्शनास आणून दिले. यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी युध्दपातळीवर काम करुन बीडचा पाणीपुरवठा सुरळीत करा असे आदेश सीईओ नीता अंधारे यांना दिले. ▶▶ उर्वरित पान २ वर







## अखेर सात दिवसांची झुंज अपयशी; भीषण अपघातात जखमी मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू

**कडा । प्रतिनिधी**

कांदा भरण्यासाठी मजुरांना घेऊन निघालेल्या पिकअप वाहनाचे टायर फुटून झालेल्या अपघातात तिघाजणांचा मृत्यू तर १९ जण जखमी झाल्याची घटना कामगार दिनी कडा ते धामणगांव रोडवरील खोल ओढ्यात घडली होती.

दरम्यान, यावेळी गंभीर जखमी झालेल्या १५ वर्षीय मुलीचा सात दिवसांनंतर उपचार सुरू असताना मंगळवारी रात्री



मृत्यू झाला. वैष्णवी बाळासाहेब नरवडे असे मृत मुलीचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील वंजारवाडी येथील पिकअप हिवरा येथे कांदा काढणीसाठी १ मे रोजी मजूर घेऊन जात असताना कडा-धामणगाव रोडवरील खोल ओढ्यात पिकअपचे समोरीत टायर फुटून झालेल्या अपघातामध्ये दोन मुलीसह एका मुलाचा मृत्यू झाला होता. तर अन्य मजुर जखमी झाल्याची घटना घडली होती. गंभीर जखमी असलेल्या वैष्णवी बाळासाहेब नरवडे १५ वर्ष हिच्यावर अहिल्यानगर येथील खाजगी रूग्णालयात उपचार सुरू होते. सात दिवसांपासून उपचार सुरू असताना मंगळवारी रात्री तिचा मृत्यू झाला. वंजारवाडी येथे बुधवारी दुपारी तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

असा झाला होता अपघात- आष्टी तालुक्यातील वंजारवाडी येथील हर्षद महाजन हा गावातील २१ मजुरांना पिकअपमधून (क्रमांक एमएच ०१ एल २६८५) हिवरा येथे जात होता. कडा- धामणगाव रोडवर खोल ओढ्याजवळ येताच पिकअपचे टायर फुटले. त्यामुळे पिकअप पलटी होऊन ओढ्यात गेली. यामध्ये श्रावणी

▶▶ उर्वरित पान २ वर

CMYK

# कोण आहेत कर्नल सोफिया आणि विंग कमांडर व्योमिका सिंग?

पाकिस्तानी दहशतवादाला भारताने आज मोठा दणका दिला. ऑपरेशन सिंदूर राबवत भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मिरातील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. भारतीय लष्कराने आज पत्रकार परिषद घेत आज या संपूर्ण हल्ल्याची माहिती पुराव्यांसह दिली. पाकव्याप्त काश्मिरातील ५ आणि पाकिस्तानातले ४ दहशतवादी तळ भारताने बेचिराख केले. भारतीय लष्कराने १ वाजून ५ मिनिटांनी हल्ल्याला सुरूवात केली. तर १ वाजून ३० मिनिटांनी भारतीय लष्कराने ही मोहीम फत्ते केली. बरोबर २५ मिनिटांत ही कारवाई भारताने यशस्वीरित्या पूर्ण केली. आर्मीच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी पत्रकार परिषद घेत संपूर्ण माहिती दिली. या हल्ल्यात एकाही पाकिस्तानी रहिवासी विभागाला किंवा पाकिस्तानी लष्काराच्या तळाला धक्का पोहोचवण्यात आला नाही. पाकिस्तानात १०० किमी आत घुसून नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केला, अशी माहिती भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरनंतर दिली. अवघ्या २३ मिनिटांत भारतीय सैन्यदलांकडून ऑपरेशन सिंदूर फत्ते करण्यात आले. पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरबाबत भारतीय सैन्याने दिलेल्या पत्रकार परिषदेत दोन महिला अधिकाऱ्यांचाही समावेश होता. भारतीय लष्कराकडून कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ऑपरेशन सिंदूरची सगळी माहिती दिली. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा पुराव्यांसह बुरखा फाडणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग कोण आहेत?, अशी सध्या चर्चा सुरु आहे.




### ▸ कोण आहे सोफिया कुरेशी?

सोफिया कुरेशी या मूळची गुजरातची आहे. सोफिया कुरेशी यांचा जन्म १९८१ मध्ये गुजरातमधील वडोदरा येथे झाला. त्यांनी बायोकेमिस्ट्रीमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. एका माहितीनूसार सोफियाचे आजोबा देखील सैन्यात होते आणि तिच्या वडिलांनी काही वर्षे सैन्यात धार्मिक शिक्षक म्हणूनही काम केले होते. सोफिया यांनी १९९९ मध्ये भारतीय सैन्यात दाखल झाली. सोफिया यांनी १९९९ मध्ये चेन्नई येथील ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमीमधून प्रशिक्षण घेतले. २००६ मध्ये, सोफियाने काँगोमधील संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेत लष्करी निरीक्षक म्हणून काम केले. २०१० पासून त्या शांतता मोहिमेशी संबंधित आहेत. पंजाब सीमेवर ऑपरेशन पराक्रम दरम्यान तिच्या सेवेबद्दल तिला जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ (जीओसी-इन-सी) कडून प्रशंसापत्र देखील मिळाले आहे. ईशान्य भारतातील पूर मदत कार्यादरम्यान तिच्या उत्कृष्ट कामाबद्दल तिला सिग्नल ऑफिसर इन चीफ (एसओ-इन-सी) कडून प्रशंसापत्र देखील मिळाले. कर्नल सोफिया कुरेशी यांनी बहुराष्ट्रीय लष्करी सरावात भारतीय तुकडीचे नेतृत्व केले तेव्हा त्या देखील चर्चेत आल्या. भारतीय तुकडीचे नेतृत्व करणारी भारतीय लष्करातील सोफिया ही पहिली महिला अधिकारी बनली. या सरावाचे नाव 'एक्सरसाइज फोर्स १८' असे होते. या सरावात कर्नल सोफिया कुरेशी या एकमेव महिला अधिकारी होत्या.

### ▸ कोण आहे विंग कमांडर व्योमिका सिंग?

१८ डिसेंबर २००४ रोजी भारतीय हवाई दलात नियुक्त झालेल्या विंग कमांडर व्योमिका सिंग यांना सध्याच्या काळातील सर्वोत्तम विंग कमांडरपैकी एक मानल्या जातात. व्योमिका सिंग यांना लढाऊ हेलिकॉप्टर उडवण्याचा उत्तम अनुभव आहे. व्योमिका सिंग यांना अडीच हजार तासांहून अधिक उड्डाणाचा अनुभव मिळाला आहे. व्योमिकाने ईशान्य भारतातील राज्ये आणि जम्मू आणि काश्मीर सारख्या कठीण भागात चिता आणि चेतक सारखी हेलिकॉप्टर उडवली आहेत. नोव्हेंबर २०२० मध्ये, त्यांनी अरुणाचल प्रदेशात एक अतिशय कठीण मोहीम राबवली आणि जीव वाचवले. भारतीय हवाई दलाचा वैमानिक म्हणून धोकादायक भागात उड्डाण करण्याचा व्योमिका सिंग यांना चांगला अनुभव आहे.

### ▸ अजमल कसाब जिथे घडला, तोच कॅम्प उद्ध्वस्त केला-

मुंबई दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणांनाही ऑपरेशन सिंदूरद्वारे लक्ष्य करण्यात आले आहे. मुरीदकेमधील लष्कर-ए-तैयबाचे मुख्यालय होते, तेही उद्ध्वस्त करण्यात आले आहे. विशेष म्हणजे मुंबईत झालेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील अतिरेकी अजमल कसाबला प्रशिक्षण देण्यात आलं होतं. त्यामुळे अजमल कसाब ज्या ठिकाणी घडला, तोच कॅम्प उद्ध्वस्त करण्यात आला आहे, अशी माहिती लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली आहे. यावेळी त्यांनी टार्गेट असलेली आणि ती ठिकाणे उद्ध्वस्त झाल्याचे फोटो देखील दाखवले.

## पान १ वरून पुढे...

### जैश-ए-मोहम्मदचं...

आता कुणाची दया करणार नाही' अशी त्याची प्रतिक्रिया आहे.

रक्तरंजित खेळ अझहरवर उलटला- भारतात शेकडो निष्पापांचे बळी घेणारा दहशतवादी आता रडकुंडीला आला. त्यानं केलेला रक्तरंजित खेळ आता त्याच्यावरच उलटल्यानं त्याच्या पायाखालची वाळू सरकली आहे. मरकज सुबहान अल्लावरचा हल्ला भारतीय सैन्याच्या अतुलनीय पराक्रमाची साक्ष आहे. कारण भारताच्या सीमेपासून मसूदचं मुख्यालय बहावलपूर तब्बल १०० किलोमीटर आत आहे. बहवालपूर लाहोरपासून ४०० किलोमीटर अंतरावर आहे. पाकिस्तानातल्या पंजाब प्रांतातलं बहावलपूर हे पाकिस्तानातलं १२ वं सर्वात मोठं शहर आहे. इथंच १८ एकर परिसरात हे जैशचं मुख्यालय पसरलं आहे. आजूबाजूच्या इमारतींना अजिबात धक्का न लावता भारताच्या क्षेपणास्त्रांनी अझहरच्या मुख्यालयाचा अचूक आणि नेमका वेध घेतला. आजवर भारतातल्या अनेक दहशतवादी हल्ल्यांचा कट अझहरनं रचला.

– २००० साली अझहरनं जैश ए मोहम्मदची स्थापना केली होती.

– २००१ मधला संसदेवरचा हल्ला, २०१६ मधला पठाणकोट आणि २०१९ मधला पुलवामा हल्ल्यात जैशचा समावेश होता.

– १९९९ मध्ये कंदाहार विमान प्रकरणात सोडलेल्या तीन दहशतवाद्यांत अझहरचा समावेश होता.

मसूद अझहर बचावला असला तरी त्याला आयुष्यभर लक्षात राहील असा धडा मिळाला आहे. आता भारतीय सुरक्षा यंत्रणा मसूद अझहरचा खात्मा कधी आणि कसा करतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

### बीड शहराच्या...

नगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) च्या संदर्भात आराखडा तयार करून त्याचेही सुव्यवस्थित नियोजन करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी नगरपालिका प्रशासनाला सूचित केले. यासोबतच नगर रोडवर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक रस्ता क्रॉसिंग करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, माजी आ.सय्यद सलीम व नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### पाकला धडा..

स्कॅल्प क्षेपणास्त्रात ४०० किलोपर्यंत स्फोटक पदार्थ वाहून नेण्याची क्षमता आहे. राफेल सर्व प्रकारच्या हल्ल्यांना सक्षम आहे- राफेल हे फ्रेंच कंपनी डसॉल्ट एव्हिएशनने बनवलेले ट्विन-इंजिन मीडियम मल्टी-रोल कॉम्बॅट एअरक्राफ्ट आहे. राफेल लढाऊ विमाने 'सर्वव्यापी' विमाने म्हणून ठेवण्यात आली आहेत जी युद्धात महत्त्वाची भूमिका बजावण्यास सक्षम आहेत. ओम्निरोल म्हणजे सर्वव्यापी भूमिका, म्हणजेच अनेक भूमिका बजावण्याची क्षमता. हा शब्द प्रामुख्याने विमान वाहतुकीत वापरला जातो. जिथे याचा अर्थ असा होतो की विमान हवेतून हवेत लढाई, हवाई समर्थन, हवाई बॉम्बस्फोट इत्यादी विविध मोहिमा करण्यास सक्षम आहे. म्हणूनच राफेल विमानांना जागतिक स्तरावर सर्वात सक्षम लढाऊ विमान मानले जाते. त्याची वैशिष्ट्ये काय आहेत? राफेल हे चौथ्या पिढीतील लढाऊ विमान आहे. हे एक लढाऊ विमान आहे जे अनेक भूमिका बजावण्यास सक्षम आहे. जमिनीवर आधार, खोलवर हल्ला आणि जहाजविरोधी हल्ला करण्यास सक्षम. त्याची शक्ती यावरून मोजता येते की ते लहान अण्वस्त्रे वाहून नेण्यास सक्षम आहे. राफेल विमान ९५०० किलो भार उचलण्यास सक्षम आहे. या लढाऊ विमानाचा कमाल वेग १३८९ किमी/तास आहे. हे जेट एकाच वेळी ३७०० किमी पर्यंत प्रवास करू शकते.

भारताने राफेल का निवडले? राफेल हा भारतासमोर एकमेव पर्याय नव्हता. अनेक आंतरराष्ट्रीय विमान उत्पादक कंपन्यांनी भारतीय हवाई दलाला ऑफर दिल्या होत्या. नंतर, सहा प्रमुख विमान कंपन्यांची निवड करण्यात आली. यामध्ये लॉकहीड मार्टिनचे एफ-१६, बोईंग एफ/ए-१८एस, युरोफायटर टायफून, रशियाचे मिग-३५, स्वीडनचे साबचे ग्रिपेन आणि राफेल यांचा समावेश होता. सर्व विमानांच्या चाचणी आणि त्यांच्या किमतीच्या आधारे, भारतीय हवाई दलाने राफेलची निवड केली. त्याच्या किमतीनुसार, त्याची क्षमता सर्वोत्तम मानली जाते.

आणखी २६ राफेल भारतात येणार- भारतीय लष्कराच्या ताफ्यात लवकरच आणखी २६ नवीन राफेल लढाऊ विमाने सामील होतील. भारत सरकारने फ्रान्सकडून २६ राफेल-मरीन लढाऊ विमाने खरेदी करण्यासाठी ६३,००० कोटी रुपयांच्या कराराला मान्यता दिली आहे. यामध्ये २२ सिंगल-सीटर जेट्स आणि चार डबल-सीटर विमानांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीने मंजूर केलेल्या या कराराचा उद्देश हिंद महासागर क्षेत्रात वाढत्या चीनच्या प्रभावादरम्यान भारताची नौदल शक्ती वाढवणे आहे.

### बीडच्या पाणी...

बीडकरांना कायमच पाणी प्रश्न भेडसावत आहे. शहरातील काही भागात १५ ते २० दिवसांआड पाणीपुरवठा होतो. काडीवडगाव ते बीड पाईपलाईनच्या दुरुस्तीचे सध्या सुरू आहे. यामुळे बीडकरांना महिनाभरापासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी काडीवडगाव प्लान्टच्या कामाची पाहणी केली. यावेळी सीईओ नीता अंधारे उपस्थित होत्या. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाईपलाईनच्या चार पैकी तीन लिकेजचे काम पूर्ण झाले आहे. यामुळे आज कमी दाबाने शहराला पाणीपुरवठा करण्यात आला. लवकरच चौथ्याही लिकेजचे काम पूर्ण होऊन दोन दिवसानंतर पूर्ण क्षमतेने बीड शहराला पूर्वीप्रमाणे पाणीपुरवठा होईल असे सीईओ नीता अंधारे, महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान बीडचा गंभिर पाणीप्रश्न तिनही जिल्हाप्रमुखांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिला. महिनाभरापासून बीडकरांचे कशा पध्दतीने हाल होत आहेत असे त्यांनी एकनाथ शिंदे यांना फोन करुन सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आणि सीईओ नीता अंधारे यांचे फोनवर बोलणे करुन देत युद्ध पातळीवर काम करून बीड शहराला पाणीपुरवठा तात्काळ सुरू करा असे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सीईओ अंधारे यांना दिले.

### अखेर सात...

विक्रम महाजन (वय १४), अजित विठ्ठल महाजन (वय १४) ऋतुजा सतीश महाजन (वय १६) हे तीन मजूर ठार झाले तर १९ जखमी झाले होते. आता गंभीर जखमी वैष्णवी बाळासाहेब नरवडे हिचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने अपघातात मृतांची संख्या चार झाली आहे.

हे झाले होते जखमी- शंकुतला नरवडे, सिंधुबाई महाजन, सखुबाई नरवडे, अंतिकाबाई महाजन, स्वाती महाजन, , गीता महाजन, शांताबाई नरवडे, अर्चना नरवडे, कांता महाजन, हर्षल महाजन, पल्वती महाजन, शीतल नरवडे, नंदा नरवडे, राजश्री महाजन, मनीषा गोरे, हरिचंद महाजन, द्वारका महाजन हे जखमी झाले आहेत.

## पान ४ वरून पुढे...

### खरीप हंगामासाठी...

करा.स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेसह शेतकऱ्यांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढा.शेतकऱ्यांना विम्याची रक्कम व कर्जवाटप मुदतीत करा.शेतकऱ्यांना मशागत व पेरणी पूर्व मार्गदर्शन करा.क्षारपड जमिनीत सुधारणा होण्यासाठी तसेच या जमिनीची उपयुक्तता वाढविण्यासाठी उपाययोजनांवर भर द्या.मतदारसंघातील रेशीम उत्पादकता वाढविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करा.' आष्टी पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील लागवडी लायक हेक्टरी क्षेत्र,आणि त्या क्षेत्रामध्ये पिकांनुसार लागवड योग्य क्षेत्र व त्या प्रमाणात उपलब्ध होणारे खत व बियाणे यांच्या बाबतचा तुटवडा तसेच आष्टी पाटोदा व शिरूर तालुक्यासाठी खत व बियाणांसाठी महामंडळाचा असणारा रॅक पॉइंट हा परळी या ठिकाणी असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आष्टी पाटोदा व शिरूर तालुक्याला खतांचा दरवर्षी तुटवडा जाणवतो त्यामुळे याबाबत संबंधितांशी बोलून आष्टी मतदार संघासाठी आष्टी येथे नवीन रॅक पॉईंट मिळवण्यासाठी योग्य पाठपुरावा करण्याबाबत चर्चा झाली आहे तसेच बीज प्रक्रिये बाबत शेतकऱ्यांना कृषी सहाय्यक अधिकारी यांच्याकडून योग्य ती माहिती व त्यासाठी लागणारे औषधे उपलब्ध होत नाहीत व कृषी सहाय्यकांकडून प्रात्यक्षिक दिले न गेल्यामुळे अनेक शेतकरी कुठलीही बीज प्रक्रिया न करता आपल्या बियाणांची शेतामध्ये पेरणी अथवा लावणी करतात तसेच शिरूर कासार तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावरती तूर आणि कापूस हे प्रमुख पीक घेतले जाते परंतु एकाच कंपनीचे बियाणे कृषी विक्रेत्यांच्याकडून वारंवार शेतकऱ्यांना दिले जाते त्यामुळे कापूस व तूर या पिकाची दरवर्षी मिळणारे सरासरी यामध्ये तफावत येत आहे .त्यामुळे कृषी विक्रेत्यांना विनंती आहे की वेगवेगळ्या प्रजातीच्या बियाणांची आपण शेतकऱ्यांना माहिती देऊन ते लागवड करण्यासाठी व पेरणीसाठी प्रोत्साहित करावे. आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणावर खते व बियाणांचे लिंकिंग स्वरूपात विक्री सुरू आहे उदाहरणार्थ ज्या शेतकऱ्यांना युरिया घ्यायचा आहे त्या शेतकऱ्यांना नॅनो युरियाची बॅग घेणेबाबत सक्ती होत आहे.

### माजी उपमुख्यमंत्री...

समता परिषदेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासमोर फटाके वाजवून आणि पेढे वाटून न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याला आज मोठे यश मिळाले असून सुप्रीम कोर्टासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे. राज्यात सन २०२२ नंतर ओबीसी आरक्षणासंदर्भात नेमण्यात आलेल्या बांठिया कमिशनने योग्यरित्या अहवाल गोळा न केल्याने ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आले होते. या विरोधात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने सुप्रीम कोर्टात ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. याबाबत माजी खासदार समीरभाऊ भुजबळ हे स्वतः विशेष लक्ष देऊन सुप्रीम कोर्टात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने विशेष प्रयत्न करत होते. याचिकेच्या सुनावणीदरम्यान माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, ड. मंगेश ससाणे हे ज्येष्ठ वकिलांसह दिल्लीत उपस्थित होते. त्यांनी सर्वांशी चर्चा करून आपली भूमिका मांडली. या लढ्याला यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत निर्णय देताना सुप्रीम कोर्टाने सन २०२२ च्या पूर्वी असलेले ओबीसींचे २७ टक्के राजकीय आरक्षण कायम ठेऊन निवडणुका घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. ओबीसी, भटक्या विमुक्त समाजाच्या राजकीय अस्तित्वासाठी हा अतिशय महत्वपूर्ण निर्णय आहे. गेल्या आठवडाभरात ओबीसींच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे दोन निर्णय झाले असल्याने ओबीसी समाजात आनंद व्यक्त करण्यात येत आहे. केंद्र सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणनेचा निर्णय, तसेच सुप्रीम कोर्टाने दिलेला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातील निर्णय हे ओबीसींच्या अस्तित्वासाठी अतिशय महत्वाचे आहेत असे प्रतिपादन समता परिषदेचे राज्य सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी व्यक्त केले आहे.

### रानडुकराच्या...

व्यक्ती गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजार रुपये व किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपये औषधोपचारासाठी खर्च दिला जातो. मात्र बहुतेक वेळा याची माहिती वनविभागाला दिली जात नसल्याने जखमी मदतीपासून वंचित राहिल्याचे दिसून येते कारण मदतीसाठी हल्ला झाल्यानंतर ४८ तासाच्या आत वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना कळवुन ३ दिवसांच्या आत पंचनामा होणे अपेक्षित असते तरच लाभास संबंधित पात्र ठरतो. नानासाहेब श्रीरंग हजारे यांच्या बाबतीत हल्ल्याची घटना उलटून १५ दिवस झाल्याने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांच्याशी संवाद साधत बीड जिल्हा रुग्णालयातील कागदपत्रे तपासून सहानुभूती पुर्वक विचार करून मदत द्यावी अशी विनंती केल्यानंतर सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन अशोक काकडे यांनी दिले आहे. दि.२० एप्रिल रोजी रात्री १० वाजता बीड तालुक्यातील पिंपरी गावातील शेतकरी नानासाहेब श्रीरंग हजारे हे तळ्याशेजारी असलेल्या शेतातील वैरणीच्या कडब्या शेजारी झोपलेल्या अवस्थेत असताना तळ्यावर पाणी पिण्यासाठी आलेल्या रानडुकरांनी हल्ला केला.त्यात त्यांचा जबडा फाटला असुन पायाला दुखापत झाली. त्यानंतर त्यांनी औषधोपचारासाठी लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गाठले. त्याठिकाणी उपचाराची सोय नसल्याने त्यांना रूग्णवाहिकेतुन नेकनुर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवले. रात्री १२ वाजता नेकनुर ग्रामीण रुग्णालयातुन उपचाराची सोय नसल्याने बीडच्या जिल्हा रुग्णालयात पाठवले त्याठिकाणी केवळ एक इंजेक्शन दिले आणि एकदाच पट्टी केली. नानासाहेब हजारे यांनी उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी यांनी हलगर्जीपणा केल्याचा आरोप केला असुन सर्वसामान्य लोकांकडे जिल्हा रुग्णालयात लक्ष देत नसल्याची खंतही डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलून दाखवली.

### बीड शहराच्या...

असती तर नगर विकास मंत्री व पालक मंत्र्यांना बीडला बोलावून प्रशासनास बैठक घेऊन पाणी देण्यास भाग पाडले असते पण पाणी प्रश्नातही त्यांना राजकारण सुचते पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बीड शहरातील जनतेच्या पाणी प्रश्न बाबत प्रामाणिकपणे लढत असून लवकरच हा पाणी प्रश्न सोडवून घेणार असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी व्यक्त केला आहे.

### जायकवाडी प्रकल्प...

यांच्याकडे पाठपुरावा करून जायकवाडी टप्पा -२ माजलगाव धरणासाठी उजव्या कालव्याचे नूतनीकरण करण्यासाठी ५२० कोटी रू.चा निधी मंजुर करून घेण्यात आला. या कालव्याचे नूतनीकरणाचे काम मार्च २०२४ पासुन सुरू करण्यात आले असुन सद्यस्थितीत १३२ कि.मी. पैकी १०५ कि.मी. (८०%) काम पूर्ण करण्यात आलेले आहे. यामुळे पाणी वहन क्षमता ९०० क्युसेस वरून २२०० क्युसेस झाली आहे. तसेच पाण्याची गळती व अपव्यय कमी झाल्यामुळे उजव्या कालव्याद्वारे सिंचन पाणी पाळी २० ते २२ दिवस चालवावी लागत होती. यातील कमी होवुन १४ ते १५ दिवसात पूर्ण होत आहे. भविष्यात पावसाळ्या मध्ये माजलगाव धरण पूर्ण क्षमतेने भरून अधिकची सिंचन व्यवस्था निर्माण होणार आहे.

### दुकानासमोर लावलेले...

रवी सुंदुर काळे रा.जोगेश्वरी पारधी पेढी,पारा, ता.वाशी,जि.बीड व इतर साथीदारांसह केला असल्याचे कबुली दिली असुन गुन्हयातील गेलामाल पैकी ६४,०००/- रु मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. नमुद दोन्ही आरोपीतांना पो.स्टे.बीड ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन इतर चार आरोपींचा शोध घेवुन अटक करण्याचे प्रयत्न चालु आहे. पुढील तपास पो.स्टे.बीड ग्रामीण हे करीत आहेत. सदरची कामगिरी श्री.नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपोअ बीड, पो. नि. श्री.उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोह/ महेश जोगदंड, पोह/राजु पठाण, पोह/तुषार गायकवाड, पोअं/बप्पासाहेब घोडके, चालक पोह/गणेश मराडे स्था.गु.शा.बीड यांनी मिळुन केली आहे.

### स्व.चंद्रकला...

करण्यात येतो त्या प्रमाणे या वर्षी चि.संग्राम बाबारावं खाडे व मुलीतुन कु.जयश्री.गोरखराव घुले या विद्यार्थीची निवड करण्यात आली त्यांना आर्थिक स्वरूपात मानधन,एक स्कूल बॅग,शालेय साहित्य व शालेय उपयोगी वस्तूची किट देण्यात आली व कु.जयश्री चि दहावी बोर्ड चि फिस देखील तिला देण्यात आली. प्रसंगी कार्यक्रमासाठी आर्य समाजचे जेष्ठ सोमनाथ अप्पा कांबळे, जेष्ठ पत्रकार अनिल महाजन,जीवनदीप ज्ञानदीप चे प्रा.रामकिशन चोरे , जेष्ठ पत्रकार सय्यद शाकेर ,राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष नितीन शिनगारे,पत्रकार संघटनेचे अध्यक्ष अतुल शिनगारे, कायाकल्प फाउंडेशन अध्यक्ष दिनेश कापसे अंनत भोसले,गणेश सावंत, माजी नगरसेवक रुपेश चिद्रवार , व्ही.के हिरो शो रूम चे सुरज कोमटवार,ऍड. मोहन जी भोसले,विश्वानंद तोषणीवाल, अशोक मुंडे,सचिन वैष्णव व इतर मान्यवर उपस्थित होते. रुपेश चिद्रवार यांनी बोलताना सरांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उतरून नावीन्य पणा ओळखून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करावी अशी अशा बाळगली, तर अनिल महाजन यांनी सरांन बद्दल गोरद्गगार काढून सरां चे कार्य जेवढ बोलू तेवढं कमी आहे, अखंड आणी अविरत कार्या बद्दल शुभेच्छा दिल्या , विराज ला पुढील उजवलं भविष्या साठी शुभेच्छा दिल्या, कार्यक्रमाचे सूत्रसंचलणं ज्ञानेश्वर शिंदे यांनी तर अभारप्रदर्शन प्रा.रामकिसन चोरे यांनी केले.

### जिल्हापरिषदेच्या नुतन...

या महापुरूषांसह दिवंगत लोकनेते सुंदरराव सोळंके व लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे पुतळे उभारण्याचे प्रस्तावित असून जिल्हापरिषदेच्या ईमारतीसमोर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात यावा असा अनेक वर्षापुर्वीचा ठराव मंजूर असुन याची अंमलबजावनी व्हावी यासाठी शंभुप्रेमींनी वारंवार आंदोलने केलेली आहेत. दि.१९ मार्च २०२२ रोजी ३ वर्षांपूर्वी नुतन प्रशासकीय ईमारतीचे लोकार्पण करण्यापुर्वी अगोदर पुतळ्यांची उभारणी व नंतर नव्या ईमारतीत कारभार अशी भुमिका घेत धरणे आंदोलन करण्यात आले होते. सत्ताधा-यांनी स्मारकांचे भुमिपुजन करून लवकरच काम पुर्ण करण्यात येईल या आश्वासनानंतर लोकार्पण करण्यात आले. ३ वर्षे उलटुनही स्मारकांचा प्रश्न प्रलंबित असुन सत्ताधारी व जिल्हाप्रशासनाला विसर पडला आहे. जिल्हापरिषद आवारातील महापुरूष व लोकनेत्यांच्या स्मारकाबाबत जिल्हाप्रशासन गंभीर नसुन बांधकाम विभाग व लेखा व वित्त विभाग यांचा कागदी घोडे नाचवण्याचा प्रकार अतिशय संतापजनक असुन १९ मार्च २०२३ रोजी भुमिपुजनानंतर ३ वर्ष होऊन गेले तरी कामाचा पत्ताच नाही व पुतळ्यांचा खर्च व निधी याबाबी अधांतरीच आहेत. शंभुप्रेमीमध्ये याबद्दल तिव्र नापसंती असून लवकरात लवकर काम सुरू करून पूर्णत्वास नेले नाही तर आधिक तीव्र आंदोलने करण्यात येतील.

### बीडमध्ये स्पा...

वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी छापा मारला. यात एका पीडितेची सुटका करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखलची प्रक्रिया सुरू होती. ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरचे पोलिस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, मनोज परजणे, अशपाक सय्यद, सुशेन पवार, सचिन अलगट, रेश्मा कवळे आदींनी केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# बीड जिल्ह्यात 1 हजार 965 विद्यार्थ्यांचे आरटीई अंतर्गत प्रवेश निश्चित

## बोगस प्रवेश रोखण्यात शिक्षण विभाग सपशेल अपयशी : मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खासगी इंग्रजी शाळांतील २५ टक्के राखीव मोफत जागांवरील आरटीई प्रवेश प्रक्रियेत सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या प्रतीक्षा यादीतील तिसऱ्या फेरीतील प्रवेशाची मुदत अखेर दि.७ मे रोजी संपुष्टात येणार आहे. आत्तापर्यंत जिल्ह्यात १ हजार ९६५ विद्यार्थ्यांचे आरटीईद्वारे प्रवेश निश्चित झाले आहेत. अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते दत्ता आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे. आरटीई प्रवेशासाठी यंदा जिल्ह्यात २१४ शाळांमध्ये २ हजार २३५ जागा प्रवेशासाठी



उपलब्ध आहेत. त्यासाठी ५ हजार ७८१ अर्ज दाखल झाले होते. प्रवेशासाठी काढलेल्या सोडतीद्वारे २ हजार १८३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यानंतर ६ मे पर्यंत १ हजार ९६५ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. त्यामुळे उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या आरटीई प्रवेश प्रक्रियेत प्रतीक्षा यादीतील प्रवेशासाठी साधारण चार फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. आता चौथी फेरी ही अंतिम असणार असून यात प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जाणार आहे.

आरटीई अंतर्गत प्रवेश मिळावा यासाठी अनेक पालकांनी खोटी कागदपत्रे तयार करत मोफत प्रवेशांचा लाभ मिळवला आहे. या संदर्भात सक्षम पुरावे आढळले असून रीतसर लेखी तक्रार जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी कार्यालयास आपण दि. २७ फेब्रुवारी रोजी दिली होती या अनुषंगाने शिक्षणाधिकारी यांनी २८ फेब्रुवारी रोजी सदर तक्रारीच्या संदर्भाने गटशिक्षणाधिकारी यांना सखोल चौकशी करून आणि पडताळणी करून

| • असे झाले प्रवेश • |
| --- |
| मुख्य निवड फेरी – १५७८ प्रवेश |
| प्रतीक्षा फेरी क्र. १ – २२४ प्रवेश |
| प्रतीक्षा फेरी क्र. २ – १३४ प्रवेश |
| प्रतीक्षा फेरी क्र. ३ – २९ प्रवेश |

एकही बोगस प्रवेश होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि लेखी अहवाल कार्यालयास सादर करावा असे निर्देश दिले होते. त्यानंतर गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने ७ मार्च रोजी त्री सदस्य चौकशी समिती नेमत चौकशीचे आदेश दिले मात्र या चौकशी समितीला कितपत बोगस प्रवेश रोखण्यात यश आले आहे हे मात्र गुलदस्त्यात आहे. त्यामुळे शिक्षण विभागाकडून फक्त कागदी घोडे नाचवत बोगस प्रवेशाला एक प्रकारे खतपाणी घालण्याचे काम केले जात आहे. तेव्हा झालेल्या बोगस प्रवेशा संदर्भात उच्चस्तरीय चौकशी नेमण्यात यावी अशी मागणी आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.

# बीड शहरवासियांना चार दिवसाला स्वच्छ पाणीपुरवठा व घंटागाडी नियमित चालू करा : गणेश बजगुडे पाटील

**▸ काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर पालिका प्रशासनाला घेराव**

**बीड । प्रतिनिधी**

बीडकरांच्या जिव्हाळ्याचा व मुलभूत असा पाणीप्रश्न, घंटागाडी, स्वच्छ्तेसह विविध प्रश्नांवर आज काँग्रेसचे गणेश दादा बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात नगर पालिका प्रशासनाला घेराव घालन्यात आला. बीड शहरवासीयांची प्रचंड अवहेलना नगर पालिका प्रशासनाकडून सुरु असुन महिनाभरात एकदा ते पण अस्वच्छ पाणी शहरात सोडण्याचा महाप्रताप नगर पालिका करत असुन तो तत्काळ थांबवावा व शहरवासीयांना किमान चार दिवसाला स्वच्छ पाणीपुरवठा



करण्यात यावा. त्याच बरोबर शहरात कचरा गोळा करण्यासाठी असलेली नियमित घंटागाडी फक्त नावालाच आहे की काय ती कुठेही नियमितपणे आढळुन येत नाही. ती नियमित शहराच्या सर्व भागात घंटागाडी तत्काळ सुरू करण्यात यावी. शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग उचलण्यात यावेत. शहरातील नाल्या चार चार महिने नकाढल्यामुळे कोंडलेल्या आहेत त्या पहिल्याच पावसात तुडुंब भरुन रस्त्यावर गटारगंगा वाहील यासाठी नाल्या तत्काळ काढण्यात याव्यात व किमान आठ दिवसाला नियमित सर्व नाल्या काढल्या जाव्यात. त्याच बरोबर नगर पालिकेने जमा केलेला कचरा शहरात किंवा शहरवासीयांना त्रास होईल अशा ठिकाणी टाकु नये. यासर्व शहरवासीयांच्या महत्वाच्या प्रश्नांवर आज काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर पालिकेचे मुख्याधिकरी अंधारे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे गणेश दादा बजगुडे पाटील, ओबीसीचे नेते गणेश राउत, ओबीसी जिल्हाध्यक्ष संभाजी जाधव, इंटकचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, मनावधिकरचे जिल्हाध्यक्ष शेख रियाज, बीड तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष शेख कादर बाबा इनामदार, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हनुमान घोडके, अल्पसंख्यांकचे तालुकाध्यक्ष शेख बबलु भाई, शेख नजीर, अशोक जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात गारपीटीचा इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात ढगाळ वातावरण असून मुंबई आणि उपनगरात पावसाच्या सरी कोसळल्या आहेत, तसेच पश्चिम महाराष्ट्रात आणि काही ठिकाणी आज गारपीट होईल असा इशारा हवामान विभागाने दिला आहे. हवामान विभागाने आज आणि उद्या येलो अलर्ट दिला आहे. त्यासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात गारपीट होऊ शकते तसेच आगामी दहा मे पर्यंत तापमान घसरलेलेच राहील या काळात पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला. दरम्यान, सातारा जिल्ह्यात ७ मे रोजी गारपीट आणि वादळी पावासाची शक्यता असलाने इथे पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यात आकाश ढगाळ राहील. पुण्यातही गारपिटीची शक्यता आहे. पुण्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल असे सांगण्यात आले तर मुंबईतही सध्या पाऊस पडत आहे.

## अदिती परमेश्वर शिनगारे धारूर तालूक्यात प्रथम

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

तेलगाव येथील उच्च माध्यमीक विद्यालयातील बारावी विज्ञान शाखेच्या बोर्डाचे परीक्षेत अदिती परमेश्वर शिनगारे हि ८७.३३ टक्के गुण घेऊन तालूक्यात सर्वप्रथम आल्याने तिचे सर्वत्र कौतूक होत आहे. नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगण संचलित सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तेलगाव ता. धारूर जि. बीड या महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम ठेवत एच एस सी परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ विज्ञान शाखेचा



निकाल १००% व कला शाखेचा निकाल ९२.३९% टक्के लागला असून विज्ञान शाखेतील विद्यार्थीनी अदिती परमेश्वर शिनगारे हिंने ८७.३३% गुण घेऊन तालूक्यात सर्वप्रथम येण्याचामान मिळवला असुन तिचे या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे. ती सुप्रसिद्ध फौजदारी वकील ऍड परमेश्वर शिनगारे यांची कन्या आहे.तिच्या घवघवीत यशा बद्दूल सर्व स्तरातून स्वागत होत आहे

# गुरुकृपा इन्स्टिट्यूटची यशाची परंपरा कायम

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ अँड सायन्स यांची हिवाळी परीक्षा २०२५ फेब्रुवारी महिन्यात पार पडली यामध्ये दरवर्षीप्रमाणे फिजिओथेरपी चा निकाल लागला आणि यावेळीही गुरुकृपा इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी या निकालामध्ये बाजी मारली थर्ड इयर १००%, सेकंड इयर ८०%, तर फर्स्ट इयर ६०% असा निकाल लागला या निकालामध्ये प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला थर्ड इयर मध्ये अनुक्रमे गौरव वसंत मोरे (प्रथम), सरस्वती संजय जगताप (द्वितीय) तसेच शामल संजय चव्हाण (तृतीय) यांनी बाजी मारली त्यांच्या पाठीवर कौतुबाबतची थाप देण्यासाठी सत्कार समारंभ







आयोजित करण्यात आला होता. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आबा मिश्रा मॅम तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रशांत चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉक्टर यशवंतराजे भोसले सर हे होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अजहर सर यांनी केले यावेळी मंचावर गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य अमित बिंदू सर,पूनम कानापूरकर मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

## ‘दिलखुलास’ कार्यक्रमात युपीएससी परीक्षा उत्तीर्ण बिरदेव डोणे यांची मुलाखत

**मुंबई । प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत ५५१ वी रँक पटकावत उत्तीर्ण झालेले बिरदेव डोणे यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. 'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत गुरुवार ८, मे २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल पवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. माहिती अधिकारी वृषाली पाटील यांनी ही मुलाखत घेतली आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा-२०२४ चा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत राज्यातून ९० हून अधिक



उमदेवार उत्तीर्ण झाले असून कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील बिरदेव सिद्धप्पा डोणे हे उत्तीर्ण झाले आहेत. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेचा अभ्यास कसा करावा, अभ्यासाचे नियोजन कसे करावे, विषयांची निवड व मुलाखतीची तयारी कशी करावी, तसेच या स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी त्यांनी कशाप्रकारे अभ्यास व तयारी केली याविषयी 'दिलखुलास' कार्यक्रमातून श्री. डोणे यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

## राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत गोंडवाना विद्यापीठाचे लॉईड्स मेटल्स व ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठासोबत सामंजस्य करार



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचे लॉइड्स मेटल्स व एनर्जी तसेच पश्चिम ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठ यांच्यासोबत सामंजस्य करारांचे राजभवन येथे आदानप्रदान करण्यात आले.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार डॉ.परिणय फुके, ऑस्ट्रेलियाचे मुंबईतील वाणिज्यदूत पॉल मर्फी, कर्टीन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु मार्क ऑग्डन, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे, लॉइड्स मेटल्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी प्रभाकरन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे तसेच विद्यापीठाचे संविधानिक अधिकारी व व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. गोंडवाना विद्यापीठ व लॉइड्स मेटल्स यांच्यामध्ये गडचिरोली येथे युवकांना धातुशास्त्र, खाणकाम, कॉम्प्युटर सायन्स व अन्य विषयातील अभियांत्रिकी प्रशिक्षण देण्यासाठी स्वायत्त 'विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था' स्थापन करण्याबाबत करार करण्यात आला. तर गोंडवाना विद्यापीठ व पश्चिम ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठ यांचेमध्ये जुळे कार्यक्रम (ट्विनिंग डिग्री) आयोजित करण्याबाबत करार करण्यात आला.

# पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार व दडपशाहीमुळे आक्रमक

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यात पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार, शेतकऱ्यांना मावेजा न देणे, एकसारखा मावेजा न देणे, धनादेश न वटणे आणि पुन्हा वरून पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही करणे असे प्रकार सर्रास सुरू असुन आज दि.७ बुधवार रोजी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी पवनचक्की कंपन्यांच्या विरोधात आक्रमक झाले होते. शेतकऱ्यांचा विरोध झुगारून पोलिस बंदोबस्तात शेतकऱ्यांच्या शेतातुन विद्युत तारा ओढणा-या पवनचक्की कंपन्यांना विरोध केल्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण होते. पाटोदा पोलिस स्टेशन पोलिस उपनिरीक्षक





आदिनाथ भडके व पोलीस प्रशासन आणि अतिरीक्त कुमक व दोन पोलिसांच्या व्हॅन घटनास्थळी दाखल होत्या. तारा ओढण्यास विरोध करणाऱ्या व जबरदस्तीने तारा ओढल्यास जीवाचे बरं वाईट करून घेईन असं म्हणणा-या अक्षय बाळासाहेब मुळे या शेतकरी पुत्राला पोलिसांनी पकडुन व्हॅन मध्ये टाकुन पाटोदा पोलिस स्टेशनला नेण्यात आले. पाचेगावच्या पिडीत शेतकर्यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक बीड तसेच उपविभागीय अधिकारी पाटोदा, तहसीलदार पाटोदा आणि पोलिस स्टेशन पाटोदा यांना मावेजा देईपर्यंत तारा ओढण्याचे काम बंद ठेवून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी केली आहे. निवेदनावर विकास कृष्णाथ गिरे, बाळासाहेब भानुदास मुळे , सतिश बाबुराव गिरे ,विष्णू राम सावंत ,रहिम मक्तुम शेख , मनोज विजय गिरे , विष्णु चांगदेव गिरे , प्रकाश महादेव सावंत,काकासाहेब मारोती गिरे ,हनुमंत राम सावंत आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांची कैफियत ऐकुन सखोल चौकशी करून त्यांना न्याय द्यावा. पवनचक्की कंपन्यांकडुन सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतकऱ्यांवर दडपशाही करण्याच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत असुन यामुळे पोलिस प्रशासन व जिल्हा प्रशासनाची जनसामान्यात प्रतिमा मलिन होत असून शेतक-यांना कोणीही वाली नसल्याने प्रशासनाने शेतकऱ्यांचे तारणहार व्हावे अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एफ.बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७५५/२०२५**

**बबन ओव्हाळ व इतर वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार: १) बबन पि.सोपान ओव्हाळ, वय: ५५ वर्षे, धंदा: शेती, रा. लोणीघाट, ता. जि. बीड, २) विलास पि.सोपान ओव्हाळ, वय ५१ वर्षे चंदा नौकरी, रा. लोणीघाट ता. जि. बीड ह.मु. रिमांड होमच्या मागे, पर नं. २०६२०, महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड, ३) संतोष पि.सोपानराव ओव्हाळ, वय: ४४वर्षे, धंदा शेती, रा. लोणीघाट, ता. जि. बीड.मु. आंबेकर वसाहत, बालवाडी, पुणे ता. जि. पुणे. ४) कावेरा भ्र. मारुती धन्वे वय: ६ २ वर्षे, धंदा घरकाम, रा. एल. यु. गडकरी मार्ग, चेंबुर, बी.पी.सी.एल. प्लाट जवळ प्रकाशनगर सोसायटी, एफ. सी. आय. मुंबई, ५) हिराबाई वामन भोसले, वय: ५५वर्षे, धंदा घरकाम, रा धनेगांव सोनेगाव ता.जामखेड जि. अहमदनगर, ६) रंजना भ्र. राजाराम हराळ, वय: ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. निपाणी ता. भुम जि. उस्मानाबाद, (७) शांताबाई अ उत्तरेश्वर विद्यागर, वय ५७वर्षे चंदा घरकाम, रा. पालसिंगण ता. जि. बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे **सोपान पि. मारुती ओव्हाळ, राहणार- लोणीघाट, ता. जि. बीड हे दिनांक ०९/११/२०२३ रोजी लोणीघाट, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ते ३ हे मयताचे मुले असुन अर्जदार क. ४ ते ७ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताची पत्नी व आईवडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे सोपान पि. मारुती ओव्हाळ यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु **मयत सोपान पि.मारुती ओव्हाळ** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १६/०६/२०२५ आहे.

आज दिनांक ०६/०५/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

**(विधीज्ञ श्री. त्रिंबक जाधव)**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**

**क.लिपीक** **अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
गुरूवार, दि.०८ मे २०२५ पान ४

## आज शिवचरित्र व्याख्याते कल्याण महाराज काळे यांचे कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**

कपिलधारवाडी येथे ग्रामदैवत वाघेश्वरी माता देवीच्या कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात आज गुरुवार दि. ८ मे २०२५ रोजी रात्री नऊ ते अकरा या वेळेत सुप्रसिद्ध शिवचरित्र व्याख्याते ह.भ.प कल्याण महाराज काळे यांचे किर्तन सेवा होणार आहे तरी या श्रवण भक्तीचा सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी व वाघेश्वरी मित्र मंडळ कपिलधारवाडी यांनी केले आहे.

# खरीप हंगामासाठी, दर्जेदार बियाणे आणि योग्य दरात खते उपलब्ध करून द्या, पीक कर्ज वेळेत वितरित करा



### ● आ.सुरेश धस यांच्या खरीप आढावा बैठकीत सूचना

**आष्टी । प्रतिनिधी**

यावर्षी समाधानकारक पाऊस पडणार असल्याचे सांगितले जात असल्यामुळे पुरेसा पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांना पेरणीसाठी दर्जेदार बी बियाणे आणि योग्य दरात खते उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने नियमांचे काटकर होणे पालन करावे बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेत वाटप करावे कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी सूक्ष्म नियोजन करावे. शेतकऱ्यांपर्यंतच्या बांधावर पोचून त्यांना मार्गदर्शन करावे असे सूचना आमदार सुरेश धस यांनी तालिकास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीमध्ये सर्व खातेप्रमुखांना दिल्या आहेत.

या आढावा बैठकीसाठी पाटोदा उपविभागीय अधिकारी वसीमा शेख,आष्टी तहसीलदार वैशाली पाटील, कृषी अधिकारी सुभाष साळवे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी,पाटोदा तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके,शिरूर कृषी अधिकारी पवार आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, मतदार संघातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार )या तीन ही तालुक्यासाठी बियाणे उपलब्ध व्हावेत म्हणून आष्टी बफर स्टॉक (रॅक पॉईट) करण्यासाठी आपण वरिष्ठांशी चर्चा करणार असून,खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेत व माफक दरात दर्जेदार खते, बी-बियाणे मिळतील याची खात्री करा, यासाठी वेळोवेळी निविष्ठांची तपासणी करा असे सांगत

आ.सुरेश धस म्हणाले.. ऊस, ज्वारी, सोयाबीन, भुईमूग व कडधान्य पिकांसाठी खरीप हंगाम ात पाऊस चांगला होईल,असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे; परंतु पाऊस कमी झाला तरीही उत्पादन वाढीसाठी सूक्ष्म नियोजन करा...मतदारसंघातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक ते सहकार्य करा. २०२५-२६ मध्ये पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करा.मतदार संघातील शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांची माहिती देऊन शासकीय योजनांचा लाभ,विमा सुरक्षा मिळवून द्या.तसेच पीक कर्ज मुदतीत वितरित ▶▶ उर्वरित पान २ वर

#### ▸ कृषी सहाय्यक यांनी बांधावर जावे

**शेतकऱ्यांना कृषी योजनेची माहिती देण्यासाठी दुपारी ११ वा.नाही तर सकाळी ७-८ वा.जाऊन माहिती देणे गरजेचे असताना हे कृषी सहाय्यक वेळेचे बंधन ठेवत नाहीत.अशा कृषी सहाय्यक,कृषी मंडळ अधिकारी यांच्यावर तालुका कृषी अधिकारी यांनी ठेवणे गरजेचे आहे.पण आता यावर जर कुणाचा वचक राहिलेला नाही. परंतु जर कुणी कामात हलगर्जीपणा केला तर कुणाचीही गय केली जाणार नाही.कृषी सहाय्यक यांनी बांधावरच जावे अशी सूचना आ. सुरेश धस यांनी दिल्या.**

## माजी उपमुख्यमंत्री मा. छगनरावजी भुजबळ साहेब आणि समता परिषदेच्या लढ्याला मिळाले यश: ॲड. सुभाष राऊत

### ▸ स्थानिक स्वराज्य संस्थांतील ओबीसीचे आरक्षण कायम ठेवल्याबद्दल बीडमध्ये समता परिषदेचा जल्लोष

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी राजकीय आरक्षणासंदर्भात माजी उपमुख्यमंत्री मा. छगनरावजी भुजबळ साहेब आणि समता परिषदेच्या पाठपुराव्याला मोठे यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला सन २०२२ पूर्वी लागू असलेले २७ टक्के राजकीय आरक्षण पूर्ववत करण्याचे आणि राज्यात पुढील ४ महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.



याबद्दल समता परिषदेचे राज्य सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा.छगनरावजी भुजबळ साहेब, ज्यांच्या माध्यमातून हा पाठपुरावा सुरू होता असे माजी खासदार समीरभाऊ भुजबळ यांच्यासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब यांचे आभार व्यक्त केले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे राज्यभरातील ओबीसी समाजाने स्वागत केले असून बीड शहरामध्ये ▶▶ उर्वरित पान २ वर

## रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास २० लाखांपर्यंत मदत दिली जाते.१० लाख रूपये धनादेशाद्वारे तर १० लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या दरम हा व्याज देणा-या संयुक्त खात्यांमध्ये जमा केले जातात. तसेच अपंग झाल्यास ५ लाख रुपये,

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहराच्या गंभीर पाणीप्रश्नावर पालकमंत्री व नगरविकास मंत्र्याच्या उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रकार : जिल्हाप्रमुख उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी अहोरात्र भटकंती करावी लागत असून नगरपरिषदेच्या ढिसाळ आणि नियोजन शून्य कारभारामुळे बीडकरांना माजलगाव तलावात पाणी उपलब्ध असताना घोटभर पाणी मिळणे मुश्किल झाले आहे अशा पाणी संकटावेळी संवेदनहीन नगरपालिका प्रशासनाला पाण्यासाठी जनता टाहो फोडत असताना कधी जाग येणार आहे?

मोठा गाजावाजा करून बीडला पालकमंत्री म्हणून आलेले उपमुख्यमंत्री अजित पवार व नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे



यांनी तात्काळ बीडला येऊन प्रशासनाची बैठक घेऊन पाणी प्रश्न मार्गी लावणे अपेक्षित असताना हे दोन्ही उपमुख्यमंत्री फोनवरून सूचना देत आहे हे म्हणजे उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रकार आहे असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हटले आहे.

पाणी प्रश्न सत्ताधारी हे जिल्हाधिकारी यांना निवेदन देत आहे तर कुणी न पवार मोर्चा काढत आहे कुणी पत्रकावर समाधान मानत आहे सत्ता असतानाही त्यांच्यावर ही वेळ येणे दुर्दैवी असून यावरून हेच सिद्ध होते की हे सरकार गेंड्याची कातडी पांगरलेली आहे पण बीड शहरातील जनतेच्या हे पूर्ण लक्षात आले असून फक्त मतांसाठी पत्रक बाजी करायची ह्या पत्रकार नेत्यांना खरंच बीडच्या पाणीप्रश्नाची तळमळ ▶▶ उर्वरित पान २ वर

## जायकवाडी प्रकल्प उजव्या कालव्याच्या नुतनीकरणा मुळे माजलगाव धरणात पूर्ण क्षमतेने पाणी उपलब्ध होणार : आ.प्रकाशदादा सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

पैठण उजवा कालवा हा १३२ कि.मी. लांबीचा असून कालव्याचे काम सन १८८४ मध्ये पूर्ण करण्यात आलेले असून बहुतांश कामे रोजगार हमी योजना मार्फत करण्यात आलेली आहे. पैठण उजव्या कालव्याद्वारे छ.संभाजीनगर, आहिल्यानगर व बीड जिल्ह्यातील एकुण ४१६८२ हे. सिंचन होते. या कालव्याची संकल्पीय पाणी वहन क्षमता २२५० क्युसेस एवढी आहे. परंतु



आज पर्यंत उजव्या कालव्यातून ८०० ते ९०० क्युसेस पाणी वहन क्षमता होत होती. या मध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती व अपव्यय होत होता. त्यामुळे माजलगाव धरणात केवळ जायकवाडी प्रकल्पातुन ८०० ते ९०० क्युसेस पाणी उपलब्ध होत होते. माजलगाव धरणात २२५० क्युसेसने पाणी उपलब्ध व्हावे यासाठी उजव्या कालव्याचे १३२ कि.मी. चे आधुनिक पध्दतीने नूतनीकरण करण्याची आवश्यकता होती. त्यामुळे मागील २ ते ३ वर्षापासून सतत मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस

▶▶ उर्वरित पान २ वर

## दुकानासमोर लावलेले टायरची चोरी करणारी टोळी गुन्हे शाखा बीड ने पकडून दोन आरोपी केले जेरबंद



**बीड । प्रतिनिधी**

दि.१५ मार्च रोजी बीड बायपास रोड लगत शिदोड शिवार ता.जि.बीड येथे फिर्यादी गणेश महादेव गायकवाड व्यवसाय गुत्तेदारी, रा. सुभाष कॉलनी पेठ बीड यांचे गॅरेज लाईन चे गाळया समोर उभे असलेल्या आमचे टाटा कंपनीचे दहा टायरी वाहनाचे आठ टायर्स ९६,०००/- व आठ डिक्स २४०००/- तसेच अखील खान यांचे त्या परिसरात असलेले दुकानासमोर ठेवलेले वेगवेगळया कंपनीचे ०७ टायर १४०००/- रु असे दोन ठिकाणांवरील एकुण १,३४,०००/- रु चा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला म्हणुन दिनांक १७/०३/२०२५ रोजी पो.स्टे. बीड ग्रामीण गुरनं ७९/२०२५ क.३०३(०२) भादंवि प्रमाणे अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हयाची नोंद करण्यात आली होती.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख यांनी अधिपत्याखालील पोउपनि श्री. महेश विघ्ने यांचे पथकास आरोपी शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन केले होते. पोउपनि महेश विघ्ने यांनी आपल्या पथकातील अंमलदारसह आरोपीची गोपनिय माहिती काढण्यास सुरुवात केली.दिनांक ०४/०५/२०२५ रोजी आरोपी शोध घेत असतांना गोपनिय माहिती द्वारे कळाले की इसम नामे पापा उर्फ रामेश्वर राजेंद्र शिंदे याने व त्याचे इतर साथीदाराने मिळुन सदर गुन्हा केला आहे. त्यानंतर पथकाने सदर इसमास इंद्रापेढी येथुन ताब्यात घेवुन गुन्हया अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने त्याचे इतर साथीदार ▶▶ उर्वरित पान २ वर

## स्व.चंद्रकला बाई विष्णुपंत शिंदे यांच्या स्मरणार्थ आदर्श विद्यार्थी पुरस्कार प्रदान




**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील जीवन ज्ञानदीप गुरुकुल येथे स्व.चंद्रकला बाई विष्णुपंत शिंदे यांच्या स्मरणार्थ आदर्श विद्यार्थी पुरस्कार प्रदान तसेच दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी चि.विराज ज्ञानेश्वर शिंदे याचा १४ वा वाढदिवस व जीवनदीप गुरुकुल चे प्रा रामकिसन चौरे याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गोड वाटून साजरा करण्यात आला.

किल्ले धारूर शहरातील जीवनदीप ज्ञानदीप गुरुकुल या ठिकाणी दरवर्षी या गुरुकुल मधील जो विद्यार्थी शिक्षण , वर्तनूक,सहकाऱ्या सोबत व्यवस्थित वागणूक, गुरुकुल मधील नियमांचे काटेकोर पणे आवलंब करणाऱ्या विद्यार्थ्यास आदर्श विद्यार्थी म्हणुन घोषित

▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हापरिषदेच्या नुतन प्रशासकीय ईमारतीसमोरील महापुरूषांच्या स्मारकांचे काम 3 वर्षं उलटुनही रखडलेले

### ▸ पुन्हा आंदोलनाचा ईशारा : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हापरिषदेच्या नुतन भव्य प्रशासकीय ईमारतीसमोर महापुरूषांचे व लोकनेत्यांचे पुतळे उभारण्याची घोषणा,ठराव आणि फायलींचा फार्स जिल्हाप्रशासनाकडुन कामास होत असलेली दिरंगाई या धोरणाच्या निषेधार्थ व तात्काळ स्मारकाचे काम पुर्ण करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी मावळ्यांच्या वेशात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली शंभुप्रेमी बीडकरांनी जिल्हापरिषद ईमारती आवारात दि.१६ जानेवारी २०२३ रोजी छत्रपती संभाजी



महाराज राज्याभिषेक सोहळा दिनी एकदिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले होते. यावेळी तत्कालीन मुख्य कार्यकारी आधिकारी जिल्हापरिषद बीड अजित पवार यांनी स्मारक निधीची तरतूद करण्यात आली असुन चबुत-यासाठी ५ लाख व फेब्रुवारी अर्थसंकल्पात ६० लक्ष तरतूद करण्यात आली असुन पुतळ्याच्या मान्यतेसाठी शासन निर्णयाप्रमाणे विहित प्रस्ताव जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत शासनास सादर करण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात आली असुन संरक्षण भिंतीचे काम पूर्ण करून मार्च मध्ये काम सुरू करण्यात येईल असे लेखी आश्वासन डॉ.गणेश ढवळे यांना दिले होते. या घटनेला २ वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटला असुन अद्याप स्मारकांचे काम सुरू न केल्याने डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस यांनी दि.१४ एप्रिल छत्रपती संभाजी राजे जयंतीदिनी पुन्हा एकदा आंदोलनाचा ईशारा लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना दिला आहे. बीड जिल्हापरीषदेच्या नुतन प्रशासकीय ईमारतीच्या आवारात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा, छत्रपती राजश्री शाहु महाराज, महात्मा ज्योतीराव फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यावसाय; नाशिकच्या पीडितेची सुटका

### ▸ चालकाला बेड्या : बीड शहर पोलिसांची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील गजबजलेल्या आणि मध्यवर्ती ठिकाण असलेल्या सारडा कॅपिटलमधील एका तळघरात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यावसाय चालू होता. ही माहिती मिळताच बीड शहर पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून मंगळवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास कारवाई केली. यामध्ये चालकाला बेड्या ठोकल्या असून नाशिकच्या पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे.

प्रमोद सदाशिव शेळके (रा.नेकनूर ता.बीड) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. बीड शहरातील सारडा कॅपिटल परिसरात एका कोपऱ्यातील तळघरात ब्लीस नावाचे स्पा सेंटर आहे. याच ठिकाणी मागील काही दिवसांपासून वेश्या व्यावसाय सुरू असल्याची माहिती होती. मंगळवारी सायंकाळी बीड शहर पोलिसांनी डमी ग्राहकाला एक हजार रूपये देत स्पा सेंटरमध्ये पाठविले. आतमध्ये

▶▶ उर्वरित पान २ वर






CMYK